**दि.२१/६/०३ रोजी नियंत्रक शिधावाटप यांच्याकडे झालेल्या लिपिक-टंकलेखक संवर्गातून वरिष्ठ लिपिक/शिधावाटप निरीक्षक/उपलेखापाल या पदावर पदोन्नतीसाठी निवडसूची करण्याकरीता बोलाविण्यात आलेल्या पदोन्नती समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

---

विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीलर खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री.वि.ना.मोरे, मा.नियंत्रक शिधावाटप, | अध्यक्ष |
| २. श्री.एस.एस.पाटोल, उपनियंत्रक शिर्धावाटप (आस्था) | सचिव |
| ३. श्री.डी.बी.देशमुख,उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ | सदस्य |

शासन आदेशानुसार अनुशेष भरण्याची कार्यवाही ३० जून,२००३ पूर्वी करणे अनिवार्य आहे, पैकी सरळ सेवेने पदे भरण्यास तूर्त स्थगिती आहे. म्हणून अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही ही पदोन्नतीने भरावयाच्या पदांपुरतीच राहणार आहे.

नियंत्रक शिधावाटप कार्यालयाच्या आस्थापनेवर ज्या विविध संवर्गांची अनुशेषाची पदे भरावयाची आहेत, त्यापैकी शिधावाटप निरीक्षक संवर्ग व त्यावरील संवर्गांच्या ज्येष्ठता याद्यांचा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे याबाबत शासनाकडून मिळालेल्या मार्गदर्शनानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या **जैसे थे** आदेशामुळे पदोन्नतीची कार्यवाही करता येत नाही. परिणामी, फक्त लिपिक-टंकलेखक ते शिधावाटप निरीक्षक/वरिष्ठ लिपिक/ उपलेखापाल या पदांवरील पदोन्नतीची कार्यवाही करता येणे शक्य आहे. कारण लिपिक-टंकलेखक पदाची पदोन्नती ज्येष्ठता यादी न्यायालयात आव्हानित नाही असे आस्थापना शाखेकडून सांगण्यात आले.

लिपिक-टंकलेखक संवर्गातून पदोन्नतीच्या संवर्गात (शिधावाटप निरीक्षक /वरिष्ठ लिपिक/ उपलेखापाल) पदांच्या आढाव्यानंतर समर्पित पदे वगळून सध्या ६८३ पदे ही मंजूर पदे आहेत. त्यानुसार आरक्षणाच्या अस्तित्वातील टक्केवारीनुसार येणारी पदे, भरलेली पदे व अनुशेष यांचे, विवरणपत्र सोबत जोडले आहे. त्यानुसार अनुशेषाची स्थिती पुढीलप्रमाणे असल्याचे आस्थापना शाखेने स्पष्ट केले.

| प्रवर्ग | अनुशेष |
|---|---|
| अ.ज. | २५ |
| विजा (अ) | ०७ |
| भ.ज.(क) | १९ |
| भ.ज.(ड) | ०३ |
| एकूण | ५४ |

८४/५

थोडक्यात अ.ज., विजा (अ), भ.ज.(क), व भ.ज.(ड) या चार प्रवर्गात अनुशेष आहे. खुल्या प्रवर्गाचा अनुशेष भरण्याचे प्रस्तावित नाही. तसेच अपंग, अ.जा. व वि.मा.प्र. संवर्गात अनुशेष शिल्लक नसल्यामुळे त्यांचा विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे पदोन्नती समितीने उपरोक्त चार प्रवर्गातील अनुशेष भरण्यासाठी निवड यादी तयार करणे आवश्यक असल्याचे आस्थापना शाखेकडून सांगण्यात आले.

पदोन्नती देताना वास्तविक अद्ययावत ज्येष्ठता यादी ही पहिली गरज असते. लिपिक-टंकलेखक संवर्गाची अंतिम /अस्तित्वातील ज्येष्ठता यादी ही दि.१/७/१९९८ ची स्थिती दर्शविणारी आहे व त्या ज्येष्ठता यादीआधारे सप्टेंबर,२००० मध्ये काही पदोन्नत्या दिलेल्या आहेत. त्यानंतर लिपिक-टंकलेखक संवर्गाची ज्येष्ठता यादी (अलिकडील वर्षाची) अद्ययावत झालेली नाही. त्यामुळे एरवी सर्वसामान्य परिस्थितीत प्रथम अद्ययावत ज्येष्ठता यादी अंतिम करुनच निवड सूची बनविणे योग्य ठरले असते. परंतु (अ) दि. ३० जून,२००३ पूर्वी अनुशेष भरण्याची आवश्यकता / शासनाचे आदेश आणि (ब) अस्तित्वातील दि. १/७/१९९८ च्या ज्येष्ठता यादी अंतिम करताना कोणत्याही कर्मचाऱ्याने ज्येष्ठता यादी आव्हानित केली नव्हती, हे आस्थापना शाखेचे प्रतिपादन या दोन बाबी विचारात घेऊन जरी ज्येष्ठता यादी दि.१/७/१९९८ ची जुनी ज्येष्ठता यादी असली तरी त्याआधारे निवडसूची बनवावी, असा पदोन्नती समितीने निर्णय घेतला.

दि.१/७/१९९८ च्या लिपिक-टंकलेखक पदाच्या ज्येष्ठता यादीनुसार यादीत समाविष्ट असणारे, अद्यापि निवृत्त किंवा पदोन्नती न झालेले म्हणजेच लिपिक-टंकलेखक पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी संबंधीत प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची (उपलब्ध उमेदवारांची) संख्या खालीलप्रमाणे असल्याचे आस्थापना शाखेने सांगितले.

| प्रवर्ग | अनुशेष | उपलब्ध उमेदवार |
|---|---|---|
| अ.ज. | २५ | ०६ |
| विजा (अ) | ०७ | ०७ |
| भ.ज.(क) | १९ | ०४ |
| भ.ज.(ड) | ०३ | ०७ |
| एकूण | ५४ | २४ |

वरील माहितीवरुन असे दिसते की, अनुसूचित जमाती आणि भटक्या जमाती (क) या प्रवर्गात अनुशेषाच्या पदांपेक्षा उपलब्ध उमेदवार कमी आहेत. तर विजा (अ), भ.ज.(ड)

प्रवर्गात अनुशेषाच्या पदांपेक्षा उपलब्ध उमेदवार जास्त किंवा पुरेसे आहेत. त्यामुळे पदोन्नती समितीने सर्वच उपलब्ध उमेदवारांचा, निवडसूचीसाठी विचार करण्याचा निर्णय घेतला.

ज्या प्रवर्गात उपलब्ध २४ उमेदवारांपैकी ११ उमेदवारांच्या बाबतीत ज्येष्ठता यादीतील अनुक्रमांक नमूद केलेले नाहीत. कारण हे उमेदवार दि.१/७/१९९८ नंतर संवर्गात आलेले आहेत. मात्र त्या सर्वांनी सेवेची ३ वर्षे पूर्ण केली असल्याचे आस्थापना शाखेने स्पष्ट केले आहे.

उपलब्ध २४ उमेदवारांपैकी श्री.बहुरे व श्रीमती नंदनवार या दोघांच्या बाबतीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा निर्णय प्रलंबित आहे, तर श्री.राठोड, संख्ये, श्रीमती घुगे, श्रीमती पालवे, श्री.सानप आणि श्री.कोडापे यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी वैध असल्याच्या नोंदी आस्थापना शाखा संबंधितांच्या सेवा-पुस्तकातून बैठकीच्यावेळी दाखवू शकल्या नाही. म्हणून या सर्व उमेदवारांच्याबाबतीत त्यांची पदोन्नतीसाठी पात्र/अपात्रता तपासून निवडसूची समावेशासाठी विचार झाला असला तरी, प्रत्यक्ष पदोन्नती देतेवेळी जात पडताळणी समितीने त्यांचे प्रमाणपत्र वैध ठरविल्याची खात्री करुनच त्यांना पदोन्नती द्यावी. श्री.निमजे यांचे प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्यामुळे त्यांचा विचार करण्याचा प्रश्न येत नाही.

जात प्रमाणपत्र पडताळणी संबंधात दोन दिवसांपूर्वी आस्थापना शाखेला काळजीपूर्वक तपासणी करण्याच्या सूचना देऊनही समितीसमोर माहिती ठेवताना आस्थापना शाखेने काळजी घेतलेली नाही. सहा उमेदवारांच्या बाबतीत जात पडताळणी समितीच्या आदेशाची खातरजमा न करता पदोन्नती समितीला सादर केलेल्या विवरणपत्रात जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा निर्णय वैध असल्याचे नमूद केले आहे. त्याबाबत संबंधितांनी अलाहिदा उपनियंत्रकांमार्फत खुलासा करावा.

उपलब्ध २४ उमेदवारांपैकी श्री.टकले हे प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण नाही. त्यामुळे त्यांचा पदोन्नतीसाठी विचार होऊ शकत नाही. उर्वरित २३ उमेदवार प्रवेशोत्तर परीक्षेत उत्तीर्ण आहेत. तसेच वरिष्ठ लिपिक/ शिधावाटप निरीक्षक/उपलेखापाल या पदोन्नतीच्या पदासाठी पूर्वअर्हता परीक्षा विहीत केली नसल्याचे आस्थापना शाखेने सांगितले. त्यामुळे उर्वरित २३ उमेदवार निवडसूचीसाठी विचार करण्यास पात्र ठरतात.

२४ उमेदवारांपैकी श्री.पी.आर.पवार आणि श्री.बी.जी.मोरे हे दोन उमेदवार निलंबित असल्यामुळे आणि दोघांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु असल्यामुळे त्यांचा पदोन्नतीसाठी विचार न करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सर्व २४ उमेदवारांच्या खालच्या पदावरील सेवा तीन वर्षे पूर्ण झाली असल्याने, सेवा कालावधीच्या दृष्टीने ते पदोन्नतीच्या विचारात पात्र आहेत.

श्री.पवार, श्री.टकले, श्री.मोरे, श्री.निमजे व श्रीमती नंदनवार हे उमेदवार अन्य कारणाने अपात्र असल्यामुळे त्यांच्या गोपनीय अहवालाची वर्गवारी समितीने केलेली नाही.

२४ पैकी १९ उमेदवारांच्या ५ वर्षांच्या गोपनीय अहवालांची वर्गवारी समितीने केली आहे. समितीच्या तीनही सदस्यांनी आपापली वर्गवारी आपापल्या विवरणपत्रात नोंदविली आहे. ~~त्यामुळे~~ १९ उमेदवारांच्या गोपनीय अहवालाची सरासरी, ~~प्रत~~वारी ब किंवा अधिक आहे. म्हणजेच सर्वच १९ उमेदवार गोपनीय अहवालाच्या दृष्टोकोनातून, पदोन्नतीस पात्र ठरतात.

अ.ज.साठी अनुशेष २५ जागांचा असला तरी पदे सहाच आहेत, पैकी निलंबन, विभागीय चौकशी, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा निर्णय प्रलंबित /अवैध असणे अशा कारणांनी उपलब्ध सहा उमेदवारांपैकी श्री.मोरे, श्री.निमजे व श्रीमती नंदनवार हे ३ उमेदवार अपात्र ठरतात. श्रीमती रघतवान, श्री.कोडापे व श्री.सोईतकर निवड यादी समावेशासाठी पात्र ठरतात, पैकी श्री.कोडापे यांना ~~प्रदोन्नतीमूळ~~ जात प्रमाणपत्र पडताळणीवर, ~~ते~~ वैध ~~सहील~~.

वि.जा.(अ) चा अनुशेष ७ पदांचा आहे व उमेदवारसुद्धा सातच उपलब्ध आहेत. उपलब्ध उमेदवारांपैकी श्री.पवार निलंबनामुळे अपात्र ठरतात. उर्वरित सर्व सहा उमेदवार निवडसूचीसाठी पात्र ठरतात. मात्र श्री.राठोड यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता मूळ प्रमाणपत्राच्याआधारे, पडताळावी व श्री.बहुरे यांचे प्रमाणपत्र समितीने वैध ठरवले, तरच त्यांचा विचार करावा लागेल.

भ.ज.(क) प्रवर्गातील अनुशेष १९ पदांचा असून उपलब्ध उमेदवार फक्त चारच आहेत. चारही उमेदवार गोपनीय अहवालाच्या दृष्टोने पात्र आहेत. जात प्रमाणपत्रे वैध आहेत. परंतु श्री. टकले प्रवेशोत्तर परीक्षेत अनुत्तीर्ण असल्यामुळे निवडसूचीसाठी अपात्र ठरतात. उर्वरित तीन उमेदवार निवडसूचीसाठी पात्र ठरतात.

भ.ज.(ड) प्रवर्गासाठी तीन पदांचा अनुशेष असून उपलब्ध उमेदवार सात आहेत. सातही उमेदवार गोपनीय अहवालाच्या सरासरी गटवारी किंवा इतर दृष्टोने पदोन्नतीस पात्र आहेत. परंतु सातपैकी ज्येष्ठतेनुसार पहिल्या चार उमेदवारांच्या बाबतीत (श्री.संख्ये, श्रीमती घुगे, श्रीमती पालवे, श्री.सोनप) जात प्रमाणपत्र वैध असल्याचा पुरावा पदोन्नती समितीस उपलब्ध झाला नाही. परंतु आस्थापना शाखेकडून उमेदवारांच्या माहितीचे जे विवरणपत्र

समितीस सादर झाले आहे, त्यामध्ये या चार उमेदवारांची जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने वैध ठरवली असल्याचा उल्लेख आहे. यास्तव पदोन्नती समितीने निर्णय घेतला की, या चार उमेदवारांच्या प्रमाणपत्राबाबत, ती पडताळणी समितीने वैध ठरविल्याचा लेखी पुरावा दप्तरात आहे किंवा नाही याचा शोध दि. २३/६/०३ पर्यंत घ्यावा. तसा पुरावा असल्यास, सेवा पुस्तकात त्यांच्या नोंदी घ्याव्यात व नंतरच या चार उमेदवारांपैकी तीन उमेदवारांना सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी पात्र ठरवावे. अन्यथा, चार पैकी ज्यांचे जात प्रमाणपत्र वैध असल्याचा पुरावा मिळेल त्यांचे व त्यानंतर पुढील ३ उमेदवारांचा (सर्वश्री रोहिणीकर, सोसे व आव्हाड यांपैकी ज्यांचे प्रमाणपत्र वैध ठरलेले आहे) ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी विचार करावा.

अध्यक्ष व उपस्थितांचे श्री.एस.एस.पाटोल, सचिव यांनी आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे घोषित केले.

| | | |
|---|---|---|
| उ.नि.शि., | उ.नि.शि.(आस्था) | नियंत्रक शिधावाटप व |
| अ परिमंडळ, | प्रधान कार्यालय | संचालक नागरी पुरवठा |
| तथा सदस्य | तथा सचिव | तथाअध्यक्ष |